ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग,
अर्थशास्त्र, व्यापार,
सहकार, इत्यादी
विषयांस वाहिलेले
प्रमुख मराठी
वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या
पहिल्या व तिसऱ्या
बुधवारी
प्रसिद्ध होते.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

वर्ष ३२ | पुणे, बुधवार ६ एप्रिल, १९६६ | अंक ७


लहान बाल-बालिकांसाठी
व रसिक हृदयाच्या
व्यक्तींसाठीं मनमोहक वस्त्रप्रावरणें

ठाकरसी
फॅब्रिक्स

फॅशनसाठीं सर्वोत्तम पसंती

या कापडावर
असें लेबल असतें **SANFORIZED**

TM 11 MAR.



THACKERSEY FABRICS

ठाकरसी ग्रुप आफ मिल्स

• दि हिंदुस्तान स्पिनिंग एण्ड वीविंग मिल्स कंपनी लि.,

• दि इण्डियन मैन्यु. कंपनी लि.,

### इंडियन ऑइल कॉर्पोरेशनची प्रगती

आधुनिक राहणीत खनिज तेलाच्या वापराला खूप महत्त्व आता प्राप्त झालेले आहे. स्वातंत्र्यपूर्व कालात खनिज तेलाच्या बाबतीत भारताला फार मोठ्या प्रमाणावर परदेशाकडून आयात करण्यात येणाऱ्या तेलावर अवलंबून राहावे लागत असे. ह्या बाबतीतील आपले परावलंबन कमी करण्याच्या दृष्टीने इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या कार्याला साहजिकच महत्त्व आहे. कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. गोपालकृष्णन ह्यांनी वार्ताहरांशी बोलताना पुढील प्रमाणे माहिती दिली आहे. ते म्हणाले की, सध्या कार्पोरेशनच्या मालकीचे तीन तेलशुद्धीचे कारखाने असून ते गोहाटी, बरौनी आणि कोयाली येथे आहेत. ह्या कारखान्यांतून देशातच पैदा करण्यात आलेले अशुद्ध तेल शुद्ध करण्यात येत असून, सुमारे एक वर्षाच्या आतच तेलाचे उत्पादन व विक्री करणारी ही सर्वांत मोठी संघटना होईल. गुजरातमधील कोयाली येथील तेलशुद्धीच्या कारखान्यात दरसाल १२ लाख टन तेल शुद्ध करण्यात येऊ लागले आहे. ठरलेल्या उद्दिष्टापेक्षाही ही क्षमता अधिक आहे. गोहाटी येथील तेलशुद्धीच्या कारखान्याची क्षमता सालीना ७॥ लाख टनांची आहे. भारत तेलाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याची आवश्यकता उघडच आहे. परंतु हे साध्य करण्यासाठी अशुद्ध तेलाचे अधिक साठे उपलब्ध होण्याची आवश्यकता आहे. घरगुती जळण पुरविण्याच्या क्षेत्रात कॉर्पोरेशन लवकरच प्रविष्ट होणार आहे. द्रवरूप पेट्रोल घरगुती वापरासाठी पुरविण्याचे कॉर्पोरेशनने ठरविले आहे. हे द्रव पेट्रोल करण्यासाठी लागणाऱ्या टाक्या उपलब्ध झाल्यावर येत्या मे-जून महिन्यापासून गुजरातमधील तेलखाणींतून पुरविण्यांत येईल.

### भोर येथे नव्या गौळवाड्याची स्थापना

पश्चिम जर्मन सरकारच्या तांत्रिक साह्याने भोर येथे एक गौळवाडा स्थापन करण्यात येणार आहे. त्यात दररोज २० हजार लिटर दूध जंतुरहित करणारी यंत्रसामग्री बसविण्यात येणार आहे. शुद्ध दूध आणि त्यापासून तयार होणारे पदार्थ येथे तयार करण्यात येणार आहेत. गौळवाड्यासाठी येणाऱ्या खर्चापैकी दोन तृतीयांश रक्कम भारत सरकार देणार आहे. बाकीची रक्कम आंतरराष्ट्रीय सहकार संघटना उपलब्ध करून देणारे आहे. पश्चिम जर्मन सरकारचे एक जंतुशास्त्रज्ञ आणि दूधदुभत्याच्या व्यवसायातील तज्ज्ञ संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अन्न व शेती उपसंघटनेतर्फे भारताचा दौरा करण्यासाठी आले होते. त्यांनी भारताचा दोन वर्षांचा दौरा करून गौळवाडा स्थापन करण्यास योग्य अशा ठिकाणांची पाहणी केली. त्याचबरोबर दुभत्याच्या व्यवसायातील हिंदी तज्ज्ञ शिकवून तयार करण्यासाठी काय उपाय योजावे त्याचाही अभ्यास केला. गौळवाड्याचा कारभार व्यवस्थित चालण्यासाठी अशा तज्ज्ञांची फारच आवश्यकता असते. कारण, दूध जंतुरहित करून ते व्यवस्थित साठविण्याचे काम बरेच गुंतागुंतीचे असते. ह्या तज्ज्ञांना यंत्रसामग्रीच्या दैनंदिन वापराबरोबर त्या यंत्रसामग्रीची दुरुस्ती, बदली इत्यादी कामाचेही ज्ञान असावे लागते. ह्या व्यवसायांतील उच्च शिक्षण घेण्यासाठी हिंदी तंत्रज्ञांचा एक गट पश्चिम जर्मनीला पाठविण्यात आला आहे. भोर येथील गौळवाडा चालविण्याचे काम प्रथमपासूनच हिंदी लोकांकडे सोपविण्यात येणार आहे. गौळवाड्यासाठी लागणारी बहुतेक यंत्रसामग्री भारतातच स्वीडिश कारखान्याच्या मदतीने तयार करण्यात येणार आहे.


सरदारगृह


मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —


* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

महाराष्ट्र सरकारने तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग




तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




विजय पंपिंग सेट
शेतीकरिता मजबूत व कार्यक्षम
विजय पंप सेट वापरा
न्यू विजय इंडस्ट्रीज लि.
विश्रामबाग, सांगली (महाराष्ट्र)

१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग - सांगली (महाराष्ट्र)

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES
Make doubly sure by fitting



GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA
MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

# अर्थ

बुधवार, ६ एप्रिल, १९६६





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## हिंदी अर्थव्यवस्थेसंबंधी प्रा. गालब्रेथ ह्यांचे विचार

भारतामधील अमेरिकेचे माजी वकील प्रा. गालब्रेथ हे प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञही आहेत. भारताच्या अर्थ व्यवस्थेसंबंधी त्यांनी अलीकडे व्यक्त केलेले काही विचार नवे असून चिंतनीय आहेत. न्यूयॉर्क येथे आंतरराष्ट्रीय विकास संघटनेच्या वार्षिक सभेत ते बोलत होते. ते म्हणाले, की आफ्रिका आणि दक्षिण अमेरिका ह्या भू-भागातील अविकसित देशांच्या मानाने भारताची परिस्थिती अधिक अनुकूल आहे. अविकसित देशांत भारताचे प्रकरण काहीसे वेगळे आहे. आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी सामाजिक बदल घडवून आणण्याची गरज भारतात नाही. कारण भारतात सुस्थित अशी समाज रचना आधिच अस्तित्वात आहे. इतर देशांचे तसे नाही. त्या देशांतून शैक्षणिक आणि सांस्कृतिक सुधारणा अगोदर घडवून आणण्याची आवश्यकता आहे. विशेषतः दक्षिण अमेरिकेत ही गरज अधिक तातडीची आहे. तथापि भारतामधील विकासाची कामे ठरवताना अग्रहक्क देण्याच्या बाबतीत योग्य तो समतोलपणा राखण्यात आलेला नाही. औद्योगिक उत्पादन व शेतीचे उत्पादन ह्यात समतोल निर्माण करण्यात आला पाहिजे. भारताची अर्थ व्यवस्था अद्याप स्वयंचलित होण्याच्या मार्गाला लागलेली नाही. विकासाच्या कामी उपयोगी न पडणाऱ्या खर्चात वाढ झालेली असल्यामुळे स्वयंचलित अवस्थेपर्यंत पोचण्यास वेळ लागणार आहे. १९६१–६२ ते चालू वर्षापर्यंत संरक्षण खर्चात २९० कोटी रुपयांपासून ७६० कोटी रुपयांपर्यंत वाढ झालेली आहे. पोलीस दलावरील खर्चात २२ कोटींपासून ४७ कोटींपर्यंत वाढ झालेली आहे. कर्जावरील व्याज व परतफेड ह्यासाठी लागणाऱ्या रकमेत २१४ कोटींपासून ३७२ कोटींपर्यंत वाढ झालेली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमात अशा अविकासक्षम कामावरील खर्चात ६०० कोटी रुपयांची वाढ झालेली आहे.

## २० शेती-विद्यापीठे स्थापन करण्याची जरुरी

भारताच्या नियोजन मंडळाने १९८१ च्या सुमारास शेतीचे उत्पादन सध्याच्या दुप्पट व्हावे अशी आकांक्षा धरली आहे. ह्यासंबंधी अमेरिकेतील एक शेतीतज्ज्ञ प्रा. रेव्हेल ह्यांनी असे मत व्यक्त केले आहे, की भारताची वाढती लोकसंख्या लक्षात घेता हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी निदान २० शेती विद्यापीठांची स्थापना करणे अगत्याचे आहे. त्यांच्या सूचनेप्रमाणे आसाम, गुजरात, केरळ, मध्यप्रदेश, मद्रास, म्हैसूर, ओरिसा, पंजाब आणि राजस्थान ह्या राज्यांतून एकेक विद्यापीठ स्थापन करण्यात यावे. ह्या प्रत्येक विद्यापीठाने ३० लाख ते ६० लाख शेतकऱ्यांच्या वस्तीत कार्य करावे. आंध्र प्रदेश, बिहार, महाराष्ट्र आणि पश्चिम बंगाल ह्या राज्यांतून प्रत्येकी दोन विद्यापीठांची स्थापना करण्यात यावी. प्रत्येक विद्यापीठाने ५० लाख शेतकऱ्यांच्या प्रदेशात कार्य करावे. उत्तर प्रदेशात ३ शेती विद्यापीठांची स्थापना करण्यात यावी. शेतीचे उत्पादन दुपटीने वाढविण्यासाठी १९८१ च्या सुमारास १ लाख, २७ हजार शेती पदवीधरांची गरज लागेल. त्याशिवाय शेतीशी संबंधित अशी कामे करण्यासाठी प्रशिक्षित माणसे लागतील ती वेगळीच. इतकी व इतक्या प्रकारची कामे करणारी माणसे शिकवून तयार करण्यासाठी शेतीच्या शिक्षणपद्धतीत क्रांतिकारी बदल करावे लागतील. १९८१ च्या सुमारास प्रत्येक शेतकी विद्यापीठात ६ हजार शिक्षक लागतील. प्रत्येक विद्यापीठाचे अंदाजपत्रक १० कोटी रुपयांच्या घरात जाईल. शेतीविषयक आधुनिक ज्ञानाचा प्रसार करणे, संशोधन करणे, आणि उपलब्ध ज्ञानाचा शेतकऱ्यांच्या व्यवसायात प्रत्यक्ष वापर करून दाखविणे, ही कामे विद्यापीठांना करावी लागतील.

## जपान आणि रशियामधील व्यापारी संबंध

जपान आणि रशिया ह्यांच्यामधील व्यापारी संबंध वाढविण्याचे प्रयत्न उभयता देशांकडून करण्यात येत आहेत. सोव्हिएट चेंबर ऑफ कॉमर्सच्या अध्यक्षांची जपानला भेट ह्या प्रयत्नांचेच द्योतक आहे. गेल्या जानेवारी महिन्यात जपान आणि रशिया ह्यांच्या दरम्यान एका व्यापारी करारावर सह्या करण्यात आल्या. येत्या पाच वर्षांच्या काळात उभयता देशांनी परस्परात २५० कोटी डॉलर्सचा व्यापार-व्यवहार करण्याचे करारात मान्य करण्यात आले आहे. जपानने रशियासाठी १०० बोटी बांधण्याचेही कबूल केलेले आहे. उभयता देशांत विमानवाहतूक सुरू करण्यासाठी आतापर्यंत बऱ्याच वेळा वाटाघाटी करण्यात आल्या, पण त्या यशस्वी झाल्या नाहीत. आता मात्र टोकिओ ते मॉस्को अशी थेट वाहतूक करण्याचे ठरविण्यात आले आहे. रशियाचा सैबेरियातील भाग हा रशियातील औद्योगिक भागापासून हजारो मैल दूर आहे. त्यामुळे सैबेरियाचा विकास करताना नजीकच्या जपानची मदत घेणे रशियाला अधिक सोयीचे वाटते. सैबेरियात कागद तयार करण्याच्या धंद्यासाठी लागणारी यंत्रसामग्री जपानने ह्यापूर्वीच पुरविलेली आहे. आता सैबेरियातील तेलाच्या खाणींचा विकास करण्यासाठीही रशिया जपानची मदत घेणार आहे. अशी मदत देणे जपानच्याही हिताचे आहे. कारण, जपानला लागणारे तेलाचे औद्योगिक जळण सैबेरियातून तेलाच्या नळांनी पुरविता येण्यासारखे आहे. वास्तविक जपानला चीनची बाजारपेठ अधिक निकटची आहे. गेल्या काही वर्षांत चीन व रशिया ह्यांचे राजकीय वितुष्ट आल्यामुळे त्यांचे संबंध दुरावले आहेत. ह्याचा फायदा घेऊन जपानशी अधिक जवळचे संबंध जोडण्याची रशिया खटपट करीत आहे.

**परदेशीय चलनाची बचत**—हिंदुस्थान मशीन टूल्स ह्या कारखान्याने उत्पादनासाठी लागणाऱ्या परदेशी कच्च्या मालाऐवजी देशी कच्चा माल वापरण्यास प्रारंभ केला आहे. त्यामुळे कारखान्याच्या परदेशीय चलनाच्या खर्चात ९० टक्के बचत झाली असून शिवाय कारखान्यात तयार होणाऱ्या मालाच्या उत्पादनाची किंमतही कमी झाली आहे.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

### श्री. वा. पु. वर्दे ह्यांचे वार्षिक सभेतील अध्यक्षीय भाषण

(३०-३-१९६६)

#### ठेवींवरील व्याजवाढीचे परिणाम

"गेल्या वेळी मी एका गोष्टीचा उल्लेख केला होता. ती अशी, की ठेवींवरील व्याज वाढविल्यामुळे जनतेच्या हातांतील पैसा फार मोठ्या प्रमाणांत बँकांकडे ठेवींच्या रुपाने ओढला जाईल ही अपेक्षा अतिरंजित ठरण्याचा धोका आहे. उलटपक्षी, व्याजाचे वाढलेले दर बँकांच्या खर्चात भर टाकणार आहेत. आज ते खरे झालेले दिसत आहे. बँकांचे वाढते खर्च ही बँकांची डोकेदुखी होऊ पहात आहे. शिवाय सरकारी व इतर सर्वच क्षेत्रांत व्याजाचे दर वाढू लागल्याने बँकांपुढे आणखी एक गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. बँकांकडे असलेल्या गुंतवणुकीच्या रकमेवरील घसाऱ्यात वाढ होत आहे. बँकांच्या ताळेबंदांत गुंतवणुकीच्या रकमा दाखविताना सरकारी कर्जरोख्यांची बाजारभावाने येणारी किंमत न दाखविण्याची सवलत केंद्र सरकार व रिझर्व बँक यांनी दिली आहे. तथापी, त्यामुळे बँकांपुढील प्रश्न सुटत नाही. जर व्याजाचे दर असेच वाढत गेले आणि सरकारलाही वाढत्या दरांनी कर्जे उभारावी लागली तर बँकांपुढील प्रश्नही अधिक गंभीर होत जाणार आहे.

#### ठेवीदारांची संख्या ३ लक्ष झाली

"अहवालाच्या वर्षभरात आपल्या बँकेची पूर्वीप्रमाणेच सर्व दृष्टींनी समाधानकारक प्रगती झाली आहे हे सांगण्यात मला आनंद होत आहे. एकूण बँकव्यवसायांतील ठेवींमध्ये यंदाच्या वर्षी १४·४ टक्क्यांनी वाढ झालेली असली तरी आपल्या बँकेतील ठेवीमध्ये यंदा २३ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. ठेवीदारांच्या व जनतेच्या विश्वासास आपली बँक अधिकाधिक पात्र ठरत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. १९६२ मध्ये ठेवीदारांची संख्या १,७१,०८० होती; ती संख्या यंदा ३ लाखांच्या आसपास गेली आहे. म्हणजे गेल्या तीन वर्षांत ठेवीदारांच्या संख्येत ६६ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

#### छोट्या व मध्यम आकाराच्या उद्योगांना प्राधान्य

"यंदा जमा झालेल्या अधिक ठेवींचा विनियोग, उद्योगधंदा व व्यापार यांच्या गरजा भागविण्यासाठीच बँकेने केला आहे. त्यामुळे कर्जपुरवठ्याच्या प्रमाणात गेल्या वर्षीपेक्षा ३६ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. अर्थात, कर्जे मंजूर करताना नेहमीच्या प्रथेप्रमाणेच तरतेपणा कमी होणार नाही याची दक्षता बाळगलेली आहे. विशेषतः छोट्या व मध्यम आकाराच्या उद्योगधंद्यांना सर्व तऱ्हेची कर्जे मंजूर करून बँकेने जास्तीत जास्त साहाय्य केले आहे. या छोट्या व मध्यम आकाराच्या उद्योगसंस्थांना आपल्या सर्व प्रकारच्या गरजांसाठी एकाच आर्थिक संस्थेजवळ (बँकेजवळ) संबंध ठेवणे सोयीचे होते ही गोष्ट आपल्या बँकेने सतत लक्षात बाळगली आहे."

### बँक ऑफ इंडियाचे ट्रॅव्हलर्स चेक्स

आपल्याकडे गिऱ्हाईक आकर्षण्यासाठी बड्या हिंदी बँका क्रेडिट कार्डाच्या द्वारा चढाओढ करू लागल्या आहेत. तीन बँकांनी योजना जाहीर केल्या आहेत. बरोडा बँक कार्डाची माहिती आम्ही गेल्या अंकात दिलीच आहे. स्टेट बँकेची "कर्टसी कार्ड" योजना १ जुलैपासून सुरू होणार आहे. बँक ऑफ इंडियाची ट्रॅव्हलर्स चेक क्रेडिट योजना १ एप्रिल रोजी अंमलात आली. ही बँक ट्रॅव्हलर्स चेक्स देत होतीच, त्या पद्धतीमधील सुधारणा म्हणजेच ट्रॅव्हलर्स चेक क्रेडिट योजना होय. ह्या योजनेप्रमाणे, बँकेने मान्यता दिलेल्या खातेदाराला १,००० रुपयांचे ट्रॅव्हलर्स चेक्स, कोणताही चार्ज न पडता, पैसे न भरता, मिळू शकतील. सहा महिने हे चेक चालू शकतील आणि १८ महिन्यांत त्यांची परतफेड करावी लागेल. गिऱ्हाइकाने चेक्स कर्जाऊ घेतलेले आहेत, हे इतरांना कळण्यास मार्ग नाही, हे ह्या ट्रॅव्हलर्स चेक्सचे वैशिष्ट्य आहे. क्रेडिट कार्ड योजनेत गिऱ्हाइकाला आपल्याबरोबर क्रेडिट कार्ड न्यावे लागते आणि चेक कॅश करणारांना त्याचा अर्थ समजतो. बँक ऑफ इंडियाच्या योजनेचा उपयोग मोठ्या व्यापाऱ्यांपेक्षा लहान फर्मवाल्यांना वैयक्तिक गरजा भागविण्यासाठीच होणार आहे, असे दिसते. ट्रॅव्हलर्स चेक्सची मर्यादा २,००० रुपयांपर्यंत वाढविण्याचा, अनुभवाचे अंती विचार केला जाईल.

### भारत-रुमानिया ह्यांच्यामधील व्यापार

भारत आणि रुमेनिया ह्यांच्यामधील व्यापारी देवाणघेवाण चालू वर्षी मागील वर्षाच्या मानाने अधिक होणार आहे. ह्या वर्षी रुमेनियाकडून आयात करण्यात यावयाच्या पेट्रोलच्या पदार्थांत आणि रासायनिक खतात वाढ होणार आहे. १९६६ साली उभयता देशांच्या दरम्यान १७·५ कोटी रुपये किंमतीच्या मालाचा व्यापार होईल. भारत रुमानियाला लोखंडाचे खनिज, कापड, कॉफी, चहा, मिरी, तागाच्या पिशव्या, इत्यादी माल निर्यात करणार असून रुमानियाकडून खनिज तेलाचा शोध लावणारी यंत्रसामग्री, तेलाच्या विहिरी खोदण्याची यंत्रसामग्री, यांत्रिक हत्यारे, कॉस्टिक सोडा, औषधी माल व रासायनिक पदार्थ इत्यादी प्रकारचा माल आयात करणार आहे.

**Deccan Institute of Commerce**

717 Budhwar Peth, Poona 2

Telephone : 54960

**Bankers Practical Training Course**

16th Batch will start on 4th April 1966. Good prospects for securing service in Commercial, Co-operative and Postal Savings Banks. Duration : 3 months.

Time : 7-30 to 8-30 a. m. prospectus at 10 Paise.

दातांच्या स्वच्छतेसाठी

माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर

# सहकारी ग्राहक भांडारे : काही समस्या

लेखक : डॉ. र. गो. काकडे
एम्. ए., एलएल. बी., पीएच. डी.
चेअरमन, पुणे मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार लि.

( महाराष्ट्रात २२–२३ मध्यवर्ती सहकारी भांडारे आहेत. त्यांत सरकारी भागीदारी असून काही कोटी रुपयांची त्यांत गुंतवणूक होत आहे. त्या दृष्टीने या लेखात सहकारी ग्राहक भांडारांचे कार्य व त्यांच्या अडीअडचणी यांचा परामर्श घेतला आहे. )

### निराशाजनक परिस्थिती

सहकारी ग्राहक भांडाराच्या चळवळीमागील तात्त्विक भूमिकेबद्दल अगर तिच्या आवश्यकतेबद्दल आज फारसे मतभेद आढळत नाहीत. पण गेल्या ५० वर्षांतील भारतातील ह्या चळवळीबाबतचा प्रत्यक्ष अनुभव मात्र फारसा उत्साहजनक नाही, ही वस्तुस्थिती मान्य करावयास पाहिजे. काही विशिष्ट परिस्थितीत ह्या चळवळीस जोराची चालना दिली जाते व ती परिस्थिती पालटल्यावर तीस ओहोटी लागते. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात मोठमोठ्या शहरांमध्ये सहकारी ग्राहक भांडारे काढण्याचे भारत सरकारने ठरविले असून, अशा भांडारासाठी सरकारने भागभांडवल वगैरेच्या स्वरूपात आर्थिक साहाय्य देण्याच्या योजना आखल्या आहेत. या धोरणानुसार भारतातील निरनिराळ्या राज्यात मध्यवर्ती सहकारी भांडारे निघाली आहेत. आज महाराष्ट्रात अशी २२–२३ भांडारे चालू आहेत. त्यात सरकार भागीदार असून काही कोटी रुपयांची त्यात गुंतवणूक होत आहे. अशा परिस्थितीत, ही सर्व भांडारे भक्कम पायावर कशी स्थिर करता येतील, याचा विचार आवश्यक ठरतो.

### बहुशाखीय मध्यवर्ती ग्राहक भांडारे

यापूर्वी ग्राहकांच्या प्राथमिक सोसायट्या काढण्यात येत व त्यांचेकडे नियंत्रित मालाच्या वाटपाचे काम सोपविण्यात येई. वाटपाचे हे काम थांबल्यानंतर त्यांचा अंगभूत कमकुवतपणा उघडा पडे. किरकोळ व्यापाऱ्यांच्या स्पर्धेत जगण्याच्या दृष्टीने त्या फार लहान पडत. त्यांच्याजवळ पुरेसे भांडवल नसे. त्यामुळे व्यवहार कमी होई व चांगला नि व्यवहारकुशल सेवकवर्ग ठेवणे त्यांना अशक्य होई. या सर्वच कारणांमुळे ती स्वावलंबी होऊ शकत नसत. त्यांना लागणारा माल घाऊक दराने पुरविण्यासाठी सहकारी यंत्रणा नसत. लहान सोसायट्यांच्या बाबतीतील या उणीवा दाखवून नटेशन समितीने असे सुचविले की, मोठ्या शहरात एकच मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार काढण्यात येऊन त्याला शहराच्या निरनिराळ्या भागांत शाखा काढण्यास सांगावे. अशा मध्यवर्ती भांडाराला काही लाख रुपये भांडवल जमा करणे शक्य होईल. या भांडारास भागभांडवल देऊन सरकारने त्यात सहभागी व्हावे. गुदाम, मालमोटारी, इत्यादी कारणासाठी सरकारने त्यांना आर्थिक साहाय्य द्यावे. अशा मध्यवर्ती भांडाराला पुरेसे आर्थिक पाठबळ मिळणे शक्य असल्यामुळे त्याला मोठमोठ्या पेठातून व घाऊक पद्धतीवर हंगामात माल घेऊन साठविणे शक्य होईल. अशा तऱ्हेची मध्यवर्ती ग्राहक भांडारे खाजगी व्यापाऱ्यांच्या स्पर्धेत टिकू शकतील व कालांतराने स्वयंपूर्ण होऊ शकतील. नटेशन समितीची ही महत्त्वाची शिफारस भारत सरकारने मान्य केली व तीस अनुसरून ग्राहक भांडारे काढण्याची व त्यांना मदत करण्याची योजना आखली. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात निघालेली भांडारे ही नटेशन समितीच्या शिफारशीप्रमाणे बहुशाखीय आहेत. मुंबई शहरात पूर्वी अस्तित्वात असलेल्या भांडारांना नव्या योजनेत सामावून घेण्यात आले आहे.

### सद्य: परिस्थितीतील अस्थिरता

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात झालेल्या चिनी व पाकिस्तानी युद्धामुळे परिस्थितीत झपाट्याने बदल झाला आहे. विकासकार्यावरील वाढत्या खर्चात युद्धप्रयत्नांवरील खर्चाची भर पडली. जीवनावश्यक वस्तूंचे भाव बेसुमार वाढून त्या सर्वसाधारण जनतेला दुर्मिळ होऊ लागल्या. त्यांचे योग्य भावाने वाटप करण्याची आवश्यकता वाटून ग्राहक भांडारांना फार विस्तृत कार्यक्षेत्र निर्माण झाले आहे. पण अनेक प्रकारच्या सरकारी निर्बंधामुळे व सरकारी धोरणातील संभाव्य बदलांचा अंदाज बांधणे अवघड झाल्यामुळे, ग्राहक भांडारांना नटेशन समितीच्या कल्पनेप्रमाणे काम करणे जवळ जवळ अशक्य होत चालले आहे. पुणे मध्यवर्ती ग्राहक भांडाराला आपल्याजवळील ज्वारी-तांदळाचा जादा साठा सरकारला कमी भावाने, नोव्हेंबर १९६४ मधील नियंत्रणामुळे, द्यावा लागला व त्यामुळे थोडेफार नुकसान सोसावे लागले ही गोष्ट या संदर्भात नमूद करावयास पाहिजे. १९६५–६६ मध्ये ज्या ग्राहक भांडारांनी बाजरीचा साठा हंगामात केला त्यांनाही नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे. बाजारातील सध्याची परिस्थितीही अनाकलनीय झाली आहे. कोणत्या राज्यातील कोणत्या मालावरील बंदी केव्हा काढली जाईल व त्याचा आपल्या सांठ्यातील मालाच्या किंमतीवर काय परिणाम होईल याचे ठोकताळे बांधणे आज अवघड झाले आहे. अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर घाऊक दराने मालाची खरेदी करणे म्हणजे जुगार खेळण्यासारखे झाले आहे. मालात पैसे गुंतवून त्यावर ८·५ टक्के दराने व्याज भरावयाचे; गुदामाचा, विम्याचा, वगैरे खर्च करावयाचा. पण या सर्व व्यवहारांत अखेरीस फायदा होईल का नुकसान होईल याची खात्री नसावयाची ! आज ग्राहक भांडारांनी अत्यंत सावधगिरीने व कमी प्रमाणात मालाची खरेदी करावी अशी वेळ आली आहे. म्हणजे ज्या वेळी ग्राहक भांडारांना कामास भरपूर वाव निर्माण झाला आहे, नेमक्या त्याच वेळी त्यांना काम करणे अवघड होऊ लागावे ही मोठी चमत्कारिक परिस्थिती आहे.

### सरकारी खात्यातील अव्यवस्था

राज्य सरकार भागीदार असलेल्या ग्राहक भांडारांसंबंधी सरकारच्या संबंधित खात्याचा दृष्टिकोन तरी सहानुभूतीचा असावा, तर तसेही सर्वत्र आढळत नाही. सरकारनियंत्रित मालाच्या घाऊक वाटपाचे काम संपूर्णपणे ग्राहक भांडाराकडे सोपवावे, असा भारत सरकारच्या सहकारी खात्याचा फतवा आज अनेक जिल्ह्यांत अभावानेच पाळला जातो. साधा रेशनचा माल पुरविण्याबाबत भांडारांना अनेक तऱ्हेच्या अडचणींना तोंड द्यावे लागते, ही वस्तुस्थिती आहे. ज्या भांडाराकडे घाऊक वाटपाचे काम आहे त्याचेवर वेळेवर परमिटे न सोडता त्यांचा माल तसाच पाडून ठेवण्याचे प्रकारही आढळतात. अशा व्यवहारात भांडारांना मिळणारा फायदा, गुंतविलेल्या पैशावरील व्याज, गुदामभाडे, वगैरे अटळ खर्चात उडून जातो.

### भांडारांचा बाजारांवर प्रभाव नाही

मध्यवर्ती ग्राहक भांडारे ही नव्याने स्थापन झालेली असल्यामुळे आणि सध्याच्या अनिश्चित परिस्थितीमुळे ती म्हणावी तितकी बळकट झालेली नसल्यामुळे ती सर्वसाधारण बाजारभावावर परि

णाम करण्याच्या स्थितीत नाहीत. त्या त्या ठिकाणच्या एकूण आर्थिक उलाढालीत तेथील मध्यवर्ती भांडाराचे व्यवहार हे लक्षात न घेण्याइतके कमी आहेत. त्यामुळे बाजारभाव खाली आणण्याच्या दृष्टीने त्यांचा बाजारावर प्रभाव पडू शकत नाही; उलट त्यांनाच बाजाराबरोबर भाव ठेवावे लागतात. बाजारभाव रोखण्याच्या दृष्टीने आज मध्यवर्ती ग्राहक भांडारे परिणामकारक काही कामगिरी बजावतात असा दावा मांडता येणार नाही.

### किंमती रोखणे उद्दिष्ट नाही

एका दृष्टीने असा दावा मांडणे योग्यही नाही. बाजारभाव खाली आणण्याइतकी सहकारी ग्राहक चळवळ बळकट असो किंवा नसो, ग्राहक भांडारांनी आपला माल चालू बाजारभावाने पण रोखीने विकावा व अशा पद्धतीमुळे भांडारास होणारा फायदा वर्षाचे शेवटी ग्राहकांना त्यांच्या खरेदीच्या प्रमाणात बोनसच्या स्वरूपात वाटावा, असा इंग्लंडमधील ग्राहक चळवळीचा दंडक आहे. त्या देशातील ग्राहक चळवळीमागे १२५ वर्षांचा तसा अनुभव आहे. इतर देशांतील अनुभवही असेच सांगतो की, चालू बाजारभावाप्रमाणे व्यवहार करणे चळवळीच्या अंतिम हिताचे आहे. बाजारभावापेक्षा कमी दराने ग्राहक–सभासदांना माल पुरविला, पण वर्षअखेरीस बोनस वाटला नाही, तर कमी भावामुळे प्रत्यक्ष पदरात पडलेला फायदा त्यांच्या लक्षात येत नाही व ग्राहक भांडाराची उपयुक्तता त्यांना पटत नाही, असा सर्वत्र अनुभव आहे. ह्या दृष्टीने बाजारभाव रोखणे हे ग्राहक भांडाराचे उद्दिष्ट ठेवणे योग्य ठरत नाही. ग्राहकांना निर्भेळ माल, वजनमापात कमरता न येऊ देता, रास्त किंमतीत विकणे व चांगल्या व सचोटीच्या दुकानदारीचा आदर्श घालून देणे ही भांडाराची खरी उद्दिष्टे असू शकतील.

### शाखांवर लक्ष ठेवणे कठीण

भांडाराच्या नव्या मध्यवर्ती स्वरूपाच्या घडणीमुळे व्यवस्थापनेसंबंधीचे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. भांडाराची मुख्य कचेरी व भांडाराच्या शाखा यांचे संबंध कसे असावेत, त्यांचेमधील व्यवहाराचे हिशेब कसे ठेवावेत, अनेक शाखांच्या व्यवहारांवर देखरेख कशी व कितपत ठेवावयाची, अशा प्रकारचे अनेक प्रश्न भांडारापुढे वारंवार उभे राहतात. ते सोडविण्याच्या दृष्टीने सहकारी खात्याकडून मार्गदर्शन होत नाही. त्यामुळे प्रश्न संपूर्णपणे हातावेगळे होऊ शकत नाहीत. बाजारभाव वारंवार बदलत असताना शाखांची आर्थिक जबाबदारी ठरविणे व त्यावर सारखी नजर ठेवणे हे प्रत्यक्ष व्यवहारात, दिसते तितके सोपे नाही असा अनुभव आहे. शाखांवर देखरेख ठेवण्यासाठी किती खर्च करणे युक्त ठरेल हे, अनेक गोष्टींवर अवलंबून राहते. शाखांसाठी त्या त्या भागातील ग्राहक–सभासदांच्या सल्लागार समित्या नेमून त्यांचेकडे देखरेखीचे काम सोपविता येण्याजोगे आहे. पण, अशा समित्या जेवढ्या प्रमाणात तत्पर व कार्यक्षम होतील तेवढ्या प्रमाणात देखरेखीचे हे काम होऊ शकेल. पण त्यामुळे मुख्य कचेरीची, देखरेख करण्याची व शाखांच्या व्यवहारावर दैनंदिन लक्ष ठेवण्याची जबाबदारी कमी होत नाही.

### संस्था व ग्राहक यांचे संबंध

लहानशा प्राथमिक ग्राहक संस्थेमध्ये सभासद थोडे व एका भागातले असतात. त्यामुळे त्यांचे व संस्थेचे परस्पर संबंध जिव्हाळ्याचे व घनिष्ठ असू शकतात. ही गोष्ट मध्यवर्ती ग्राहक भांडाराच्या बाबतीत शक्य होत नाही. सभासद शहराच्या निरनिराळ्या भागांत विखुरलेले असल्यामुळे त्यांचेशी संबं कसे जोडावयाचे व टिकवून धरावयाचे हा अशा संस्थेपुढी महत्त्वाचा प्रश्न आहे. सभासदांनी ग्राहक भांडाराशी एकनि असावे अशी अपेक्षा करीत असताना, त्यांना भांडारापासू मिळणाऱ्या आर्थिक लाभाशिवाय त्यांचे भांडाराशी कित जवळचे संबंध आहेत ही गोष्टही महत्त्वाची ठरते. इंग्लंडसारख्य देशातही ग्राहकांच्या संस्थांचा विस्तार जसजसा वाढत चालल तसतसा त्यांचेपुढे सभासदांशी संबंध टिकविण्याचा प्रश्न उभा राहू लागला आहे.

### संस्थेविषयी निष्ठा हवी

भारतात यापूर्वी ग्राहकांच्या प्राथमिक संस्था शेकडोंनी निघाल्या व काही काळानंतर बंद पडल्या. त्या बंद पडण्यास जी अनेक कारणे आहेत त्यांत संस्थेविषयी सभासदांच्या एकनिष्ठतेचा अभाव हे एक प्रमुख आहे. ही आजही पदोपदी अनुभवास येणारी गोष्ट असली तरी तिचेवर गुणकारी उपाययोजना करणे तितके सोपे नाही.

सहकारी ग्राहक भांडाराच्या चळवळीतील काही अडचणींचा त्रोटक स्वरूपात वर उल्लेख केला आहे. दैनंदिन व्यवहारात येणाऱ्या ह्या अडचणी एकदम नाहीशा होतील असे मानणे वास्तव ठरणार नाही. पण त्याकडे सरकारच्या संबंधित खात्यांचे व सर्वसाधारण जनतेचे लक्ष वेधले गेले व त्यासंबंधी विचार सुरू झाला तरी कालांतराने त्यातून व्यवहार्य असा मार्ग निघू शकेल असा विश्वास वाटतो.

—एकता सहकार विशेषांक, चैत्र १८८८

### लष्करी मदत मिळविण्याचे पाकिस्तानचे प्रयत्न

भारत आणि पाकिस्तान ह्यांच्या दरम्यान रशियाच्या मध्यस्थीने ताश्कंद करार झाला खरा; पण त्याचे पालन पाकिस्तान कडून नीट होत नाही. किंबहुना करार न झाल्यासारखेच सम जून पाकिस्तान वागत आहे. ताश्कंद करार झाल्यानंतर उभयत देशांनी एकमेकाविरुद्धचा प्रचार थांबवावयास पाहिजे होता भारताचे अमेरिकेतील प्रतिनिधी कराराचे काटेकोर पालन करू सार्वजनिक प्रसंगी बोलताना काश्मीर प्रश्नाविषयी बोलण्याचे टाळतात. पाकिस्तानचे प्रतिनिधी मात्र अशा प्रसंगी प्रचार कर ण्याची संधी साधून घेतात. पाकिस्तानने अमेरिकेकडून लष्करी सामग्री मिळविण्याचीही खटपट चालविली आहे. काही महिन्यां पूर्वी पाकिस्तान सरकारने अमेरिकेतील वृत्तपत्रांतून लष्करी सामग्री घेण्यासाठी टेंडर्स मागविली होती. त्यानंतर इराण सरकारनेही अशीच टेंडर्स शस्त्रास्त्र कारखानदाराकडून मागविली होती. आश्चर्याची गोष्ट अशी की, ह्या दोन्ही टेंडर्समध्ये मागणी केलेल्या लष्करी साहित्याची यादी अगदी तंतोतंत सारखी होती. लष्करी साहित्यामधील सामानाचा अनुक्रमही सारखा होता. इतकेच काय, पण पाकिस्तानने प्रथम मागविलेल्या टेंडर्समध्ये ज्या चुका होत्या, त्याही जशाच्या तशाच इराणने मागविलेल्या टेंडर्समध्ये होत्या. भारत-पाक संघर्ष चालू होता त्या वेळी इराणने पाकिस्तानला काही छोटी शस्त्रास्त्रे पुरविली होती. अमेरिकेकडू पाकिस्तानला पुन्हा प्राणघातक शस्त्रास्त्रे मिळण्याचा संभव कमी असल्याने, इराणसारख्या मित्रराष्ट्राचा उपयोग करून ती मिळविण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न चालू आहे. अमेरिकेने शस्त्रास्त्रे पुरविण्याचा परवाना एकदा तेथील कारखान्यांना दिला म्हणजे त्यावर अमेरिकेचा ताबा राहात नाही. त्यांची विक्री शस्त्रास्त्रे मिळालेल्या राष्ट्राला करता येते.

श्री दूधगंगा-वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि., बिद्री (मौनीनगर), तालुका कागल, जिल्हा कोल्हापूर

# चेअरमन : श्री. हिंदुराव बळवंतराव पाटील यांचा परिचय



श्री. दूधगंगा-वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि., बिद्री ता. कागल, जि. कोल्हापूर या संस्थेचे चेअरमन मा. हिंदुराव बळवंतराव पाटील यांचे जन्मगाव कागल तालुक्यातील वाळवे खुर्द हे खेडे आहे. सामाजिक कार्याचे बाळकडू घरीच मिळाल्याने प्रथमपासूनच त्यांची सामाजिक कार्याची तळमळ व राजकीय क्षेत्राकडे ओढ दिसून येऊ लागली. घरची जबाबदारी शिरावर असतानाही त्यानी सामाजिक, राजकीय व सहकारी कार्यात पुढाकार घेण्यास प्रारंभ केला. सदर कार्याबाबतची तळमळ, निष्ठा व प्रत्यक्ष कृती यांचा सुयोग्य परिणाम होऊन त्यांचा काँग्रेस कार्यकर्त्यांशी घनिष्ठ परिचय झाला व लोक त्यांना राजकीय व सामाजिक कार्यकर्ते म्हणून मान देऊ लागले. तरुण वयात ते या कारखान्याचे चेअरमनपद भूषवीत आहेत, हे त्यांच्या कार्याचे व ते लोकमान्य असल्याचे द्योतक आहे.

### अडचणींवर मात

बिद्री सहकारी साखर कारखान्याच्या प्रस्थापनेपासूनच संचालक मंडळास अनेक अडचणी भेडसावीत होत्या. तथापि प्रथमपासूनच श्री. हिंदुराव पाटील हे कारखान्याच्या निर्मितीत प्रयत्नशील राहिले. कारखाना उभारणीच्या काळात संचालक मंडळाची पहिली निवडणूक मे, १९६२ मध्ये झाली. सदर लोकनियुक्त संचालक मंडळाचे पहिले चेअरन होण्याचा बहुमान श्री. हिंदुराव पाटील यांना लाभला. कारखान्याची उभारण करून साखर निर्माण करणे हा साखरधंद्यातील महत्त्वाचा काल आहे. चेअरमन या नात्याने श्री. हिंदुराव पाटील यांचेवर ही महान जबाबदारी पडली. जबाबदारीची जाणीव, सामाजिक कार्यावरील निष्ठा व कुशल नेतृत्व यांचा समन्वय झाल्याने नियोजित काळात मशिनरी उभारणीचे काम पूर्ण होऊन भारताचे संरक्षणमंत्री ना. यशवंतरावजी चव्हाण यांचे शुभहस्ते फेब्रुवारी १९६३ मध्ये कारखान्याने साखर निर्मितीस प्रारंभ केला.

### पाणी-पुरवठ्याची व्यवस्था

नियमाप्रमाणे आक्टोबर १९६५ मध्ये कारखान्याचे संचालक मंडळाची दुसरी निवडणूक झाली. या निवडणुकीत श्री. हिंदुराव पाटील यांचे पॅनेल प्रचंड बहुमताने निवडून आले व संचालक मंडळाचे चेअरमनपद भूषविण्याचा मान त्यांनाच लाभला. कारखान्याच्या अडीअडचणी सोडवून घेऊन साखरेचे उत्पादन वाढविणे हे ध्येय समोर ठेवून चेअरमन साहेबांनी कार्यास सुरुवात केली आहे. कारखान्यास पाण्याचा भरपूर व शाश्वत पुरवठा होत नसल्याने साखरेचे उत्पादनावर परिणाम होऊन, अंतिम कारखान्याचे व पर्यायाने सभासदांचे आर्थिक नुकसान झाले आहे. कारखान्याची पाण्याची अडचण दूर करण्यासाठी त्यांनी जातीने लक्ष घेतले असून कारखान्यापासून ६-७ मैल दूर असलेल्या भोगावती नदीतून पाणी खेचून दूधगंगा नदीत सोडावयाचे व त्याचा साठा करून कारखान्यास पाणीपुरवठा उपलब्ध करून घ्यावयाचा ही योजना त्यांनी महाराष्ट्र सरकारकडे मांडली व मान्य करून घेतली. ही तात्पुरती योजना कार्यान्वित झाली असून लौकरच पूर्ण होईल. यामुळे कारखान्यास भरपूर पाणीपुरवठा होऊन कारखाना आर्थिकदृष्ट्या सुव्यवस्थित चालेल असा विश्वास निर्माण झाला आहे.

### धरणाची योजना

कारखान्याच्या पाण्याचा प्रश्न जरी या तात्पुरत्या योजनेने सुटला असला तरी कारखान्याच्या परिसरातील शेतकऱ्यांची आर्थिक भरभराट व्हावयास या भागांतील लोकांनी मागणी केलेले नियोजित, दूधगंगा नदीवरील काळम्मावाडी धरण झाल्याशिवाय या भागाचा कायापालट होणार नाही हे त्यांना माहीत आहे व सदर योजना सत्वर कार्यान्वित करण्यासाठी श्री. हिंदुराव पाटील सातत्याने प्रयत्न करीत आहेत.

शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेल्या मा. हिंदुराव पाटील यांना शेतकरी वर्गाच्या अडीअडचणींची कल्पना असल्याने ते प्रश्न सोडवून घेण्यासाठी सामाजिक, सहकारी व राजकीय कार्यक्षेत्रात ते कार्य करीत असून कागल तालुक्यातील उदयोन्मुख अग्रणीत ते चमकतात; किंबहुना जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांतही त्यांचा समावेश होतो. कागल तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ, सहकारी ऊंस वाहतूक सोसायटी, इत्यादी संस्था स्थापन करण्यात त्यानी पुढाकार घेतला असून कागल तालुका खरेदी-विक्री संघाचे ते अध्यक्ष आहेत.

---

### अमेरिकेतील गुन्हेगारीचे अधिकृत चित्र

अमेरिकेचे अध्यक्ष प्रे. जॉन्सन ह्यांनी काँग्रेसला पाठविलेल्या खास संदेशात अमेरिकेतील गुन्हेगारीची बरीच माहिती दिलेली आहे. सधन देशातील गुन्हेगारीचे हे अधिकृत चित्र आहे. १९६५ मध्ये अमेरिकेतील गुन्हेगारीत ५ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. प्रत्येक २० मिनिटांच्या अवधीत एक बलात्काराचा गुन्हा, प्रत्येक ५ मिनिटांच्या अवधीत १ चोरीचा गुन्हा, प्रत्येक ३ मिनिटांच्या अवधीत एक भयंकर मारहाणीचा गुन्हा, प्रत्येक १ मिनिटात एका मोटारीची चोरी आणि प्रत्येक २८ सेकंदात एक घरफोडी, असे हे वेळाचे व गुन्ह्यांचे प्रमाण आहे. प्रे. जॉन्सन आपल्या संदेशात म्हणतात की, अमेरिकन माणसाचे जीवन गुन्हेगारीच्या भीतीने झाकळलेले आहे. अमेरिका हा देश आधिभौतिक सुधारणा व समृद्धी ह्यांच्या शिखरावर आहे. पण त्याची ही काळी बाजू आहे.

---

### ब्रिटनकडून मिळणाऱ्या मदतीत वाढ होणार

ब्रिटिश फेडरेशन ऑफ इंडस्ट्रीजचे माजी अध्यक्ष सर नॉर्मन किपिंग भारताचा ३ आठवड्यांचा दौरा करून परत गेले. त्यांनी आपल्या अहवालात भारतीय उद्योगधंद्यांना देण्यात येणाऱ्या मदतीत वाढ करण्याची शिफारस केली आहे. भारतात ब्रिटनच्या ६०० कंपन्या आहेत. भारतामधील सध्याच्या आर्थिक परिस्थितीचा त्यांच्यावर काय परिणाम होत आहे ह्याचा अभ्यास करण्यासाठी ते भारतात आले होते. गेल्या तीन वर्षात भारताला ब्रिटिश उद्योगधंद्यांच्या संघटनेकडून दरसाल ४० लाख पौंड मदत देण्यात येत आहे. भारतामधील कारखान्यांना लागणारी यंत्रसामग्री व इतर उपकरणे ब्रिटनमध्ये त्यांना विकत घेता यावीत म्हणून ह्या मदतीचा उपयोग करण्यात येत असतो.

### युरोपियन सामायिक बाजारपेठांतील देशांची मदत

पश्चिम युरोपातील सहा देशांनी आपली सामायिक बाजारपेठ संघटित केलेली आहे. ह्या बाजारपेठेत माल निर्यात करताना भारताला पूर्वी चालू असलेल्या जकातविषयक सवलती देण्यात येऊ नयेत असा सूर एकंदरीत दिसून येतो. पण, भारतामधील दुष्काळाच्या वार्ता युरोपमध्ये माहीत झाल्यापासून भारताच्या संकटकाली त्याला मदत देण्याची वृत्ती प्रकट झाली आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अन्न व शेती संघटनेने भारतामधील अन्नटंचाईचा केलेला अंदाज जमेस धरून बाजारपेठेचे सदस्य असलेल्या देशांनी शक्य ती सर्व मदत भारताला द्यावी असा ठराव सामायिक बाजारपेठेच्या पार्लमेंटमध्ये मंजूर करण्यात आला आहे. ह्या पार्लमेंटमध्ये ४ राजकीय गट आहेत. त्या सर्वांनी ठरावाला एकमुखाने पाठिंबा दिला. ठरावावर चर्चा करण्याची गरजही कोणास भासली नाही. ठरावावर बोलताना फ्रान्सचा प्रतिनिधी म्हणाला की युरोपियन लोकांनी काय वाटेल ते करून भारतामधील उपाशी आणि दरिद्री लोकांना ह्या संकटातून बाहेर पडण्यास मदत केली पाहिजे. भारत हा देश फार मोठा असून शांतताप्रिय आहे. प्राचीन ज्ञानाचा मोठा वारसा त्या देशाला मिळालेला आहे. अशा ह्या देशात अनावृष्टीमुळे उत्पन्न झालेल्या नापिकी परिस्थितीत लक्षावधी लोक सापडलेले आहेत. अशा परिस्थितीत तातडीचे उपाय योजून ह्या लोकांना आधार दिला पाहिजे. युरोपियन जनतेने अशी मदत केली नाही तर त्यांच्याकडून तो एक सामुदायिक गुन्हाच होईल. फ्रान्सच्या प्रतिनिधीच्या ह्या भाषणाचे इतर प्रतिनिधींनी मनापासून स्वागत केले आणि नंतर ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

### पश्चिम युरोपात चीनची चांगली पत

गेल्या काही महिन्यांत राजकीयदृष्ट्या चीन काहीसा एकाकी पडलेला दिसत आहे. परंतु आर्थिक क्षेत्रात मात्र त्याची पत चांगली आहे. त्यामुळेच पश्चिम जर्मनीने चीनला एक पोलादाची मोठी गिरणी पतीवर बांधून देण्याचे मान्य केले आहे. परदेशीय चलनाची टंचाई चीनला भासत नाही असे दिसते. चीनला गहू विकत घेता यावा म्हणून कॅनडाने गेल्या वर्षी काही अल्प मुदतीची कर्जे देऊ केली होती. परंतु चीनने ती नाकारून रोखीने गव्हाची खरेदी केली. पश्चिम जर्मनीकडून उभारण्यात येणारी पोलादाची गिरणी मात्र पतीवर उभारण्याचे चीनने ठरविले आहे. ज्या मालाचा वापर लोकांच्या राहणीत व्हावयाचा असतो अशा मालाची आयात करण्यास चीन रोख व्यवहाराचा उपयोग करतो; आणि दीर्घकालीन मुदतीच्या औद्योगिक संघटना मात्र परदेशीय कर्जाच्या साह्याने उभारतो.

### नॅट विमानांचे उत्पादन चालू

भारत आणि पाकिस्तान ह्यांच्यात गेल्या वर्षी झालेल्या संघर्षाच्या वेळी ब्रिटनने भारताला लष्करी सामग्री देण्याचे स्थगित केले होते. परंतु ह्याचा परिणाम नॅट लढाऊ विमानांच्या उत्पादनावर झालेला नाही. बंगलोर येथील कारखान्यात त्यांचे उत्पादन व्यवस्थित चालू आहे. अजूनही ह्या विमानांचे उत्पादन १०० टक्के देशी भाग वापरून होत नाही. तरीपण सुमारे ८५ टक्के सामग्री देशात तयार झालेलीच वापरण्यात येते. तथापि, काही गुंतागुंतीची यंत्रे परदेशातून आयात करावी लागतात. परदेशावरील अवलंबन कमी करण्यासाठी बंगलोर येथील कारखान्यात एक नवा विभागच उघडण्यात आला आहे.


# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
## मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी :
९, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई
टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१४, २५४७८१

: विभागीय कचेरी :
महाल : नागपूर.
तारेचा पत्ता : फार्मर बँक

| | | | |
|---|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... | रु. | ५,६५,६६,००० |
| गंगाजळी व फंड | ... | रु. | १,७५,५५,००० |
| ठेवी | ... | रु. | ४३,८६,६३,००० |
| खेळते भांडवल | ... | रु. | १,००,८६,८१,००० |

: शाखा :

( १ ) भायखळा ( २ ) गोरेगाव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्ले (पूर्व) ( ७ ) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम) (१५) सिताबर्डी (१६) धरमपेठ (१७) धन्तोली (१८) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

" चिरमुले निकेतन ", १४३/१४६ भवानी पेठ

सातारा–शहर

*दि. १८–२–६६ पासून ठेवींवरील व्याजांच्या दरांत खालीलप्रमाणे वाढ झालेली आहे.*

## मुदतीच्या ठेवी

| मुदत | | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | द. सा. द. शे. | ६=२५ |
| २ वर्षे | ,, | ६=५० |
| ३ वर्षे | ,, | ६=७५ |
| ५ वर्षे | ,, | ७=२५ |
| ७ वर्षे | ,, | ७=५० |
| ९ वर्षे व जास्त | ,, | ७=६२ |

सेव्हिंग्ज बँक खाते :—दि. १–२–६५ पासून ४ टक्के

*तसेच अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक दराने स्वीकारल्या जातील.*

याबाबत आमच्या कोणत्याही शाखेत अधिक माहिती मिळू शकेल.

**मांडवली मालाची मदत**—स्विट्झरलंड आणि भारत ह्यांच्या दरम्यान करण्यात आलेल्या करारास अनुसरून स्विट्झरलंड भारताला ३·८५ कोटी रुपये किमतीच्या भांडवली स्वरूपाच्या मालाचा पुरवठा करणार आहे. मालाची किंमत चुकती करण्यासाठी झ्यूरिक येथील चार बँकांनी कर्ज देण्याचे कबूल केले आहे. ह्यापूर्वी भारताला ७·७० कोटी रुपयांचे कर्ज देण्याचाही एक करार स्विट्झरलंडबरोबर करण्यात आला आहे.

**माती हलविण्याच्या यंत्रांचे उत्पादन**—म्हैसूर राज्यात कोलार येथे माती खणण्याची व हलविण्याची निरनिराळ्या प्रकारची यंत्रे तयार करण्याचा कारखाना उभारण्यात येत आहे. ह्या कारखान्यात १९६७-६८ साली प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ करण्यात येईल. कारखान्यासाठी लागणारे परदेशीय चलन अमेरिकेकडून कर्जाऊ मिळविण्यात येईल. काही प्रकारचे ट्रॅक्टर्स तयार करण्यासाठी जपानची मदत घेण्यात येणार आहे.

**यांत्रिक हत्यारांचा कारखाना**—यांत्रिक हत्यारे तयार करण्याचा खाजगी मालकीच्या विभागांतील एक कारखाना बंगलोर येथे स्थापन करण्यात येणार आहे. दक्षिण भारतामधील एका वाहतूक कंपनीने कारखाना उभारण्याच्या कामी क्रुप ह्या प्रसिद्ध जर्मन कंपनीचे सहकार्य मिळविले आहे. जर्मन कंपनी वसूल भांडवलापैकी ६० टक्के भांडवल पुरविणार आहे.

**ट्रॅक्टर्सचा कारखाना**—देशातील ट्रॅक्टर्सची टंचाई लक्षात घेऊन ते तयार करण्याचा एक कारखाना काढण्याचा विचार भारत सरकार करीत आहे. हा कारखाना बहुधा सार्वजनिक मालकीच्या विभागात काढण्यात येईल. मध्यप्रदेशात झेकोस्लोव्हाकियाच्या सहकार्याने तो स्थापन करण्याचा विचार चालू आहे.

**टॅक्सीवाल्यांच्या रक्षणाची सोय**—टॅक्सीचा धंदा करणाऱ्या लोकांवर काही वेळा चोरट्यांना तोंड देण्याचा प्रसंग येतो. असा प्रसंग घेतल्यास त्याची दखल घेण्याची एक युक्ती शोधून काढण्यात आली आहे. टॅक्सीच्या टपावर प्रखर प्रकाशाचा एक दिवा बसविण्यात आलेला असतो. टॅक्सीत काही झटापट झाल्यास तो दिवा एका मिनिटात ९० ते १२० वेळा उघडझाप करू लागतो. त्यामुळे बाहेरच्या लोकांना खबर मिळते. स्वीडनमधील एका टॅक्सीवाल्यानेच ही सोय शोधून काढली आहे.

**पादत्राणांचा खास कारखाना**—निर्यातीसाठी बूट तयार करण्याचा एक यांत्रिक कारखाना उत्तर प्रदेशात स्थापन करण्यात येत आहे. सरकारी व्यापार मंडळातर्फे उभारण्यात येत असलेल्या ह्या कारखान्यासाठी ३७ लाख रुपये खर्च येईल. येत्या दोन वर्षांत कारखान्यात उत्पादन होऊ लागेल आणि मग दरसाल २ कोटी रुपये किमतीच्या परदेशीय चलनाची प्राप्ती होऊ लागेल. असाच एक कारखाना बंगालमध्ये उभारण्यात येणार आहे.

**यांत्रिकीकरणामुळे नोकरकपात नाही**—आयुर्विमा कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. पांडे ह्यांनी मुंबई येथे, अशी माहिती सांगितली की कॉर्पोरेशन आधुनिक पद्धतीची गणिती यंत्रे वापरणार आहे. परंतु त्यामुळे कॉर्पोरेशनच्या नोकरवर्गात कपात करण्यात येणार नाही. कॉर्पोरेशनचा एकूण नोकरवर्ग सुमारे ५० हजार असून त्यांपैकी फक्त २५० नोकरांच्या कामावर नव्या यंत्रांचा परिणाम होईल. परंतु त्यांची बदली कॉर्पोरेशनच्या इतर खात्यांत करण्यात येईल. नव्या यंत्रसामग्रीच्या वापराने कार्यक्षमता वाढेल आणि विमेदार व एजंट ह्यांना अधिक समाधान मिळू शकेल.


राष्ट्रीय
बचत
सर्टिफिकिटे
(प्रारंभिक विक्री)
८%
व्याज

या सर्टिफिकिटात कोणत्याही सरकारी रोख्यापेक्षा अधिक व्याज मिळते. त्यामुळे ही सर्टिफिकिटे दीर्घ-मुदतीच्या गुंतवणुकीसाठी अत्यंत फायदेशीर आहेत. १० रुपये, १०० रुपये आणि १००० रुपयांच्या किमतीत ही सर्टिफिकिटे पोस्ट ऑफिसात मिळतात.

ही सर्टिफिकिटे १० वर्षे मुदतीची राहतील.

या सर्टिफिकिटावरील व्याज करपात्र आहे. परंतु कर आकारताना या सर्टिफिकिटावरील व्याज तुमच्या उत्पन्नातून वगळण्यांत येईल व अशा उर्वरित उत्पन्नाला लागू होणारा कर तुमच्या सर्व उत्पन्नाला लागू होईल.

रोख रकमेऐवजी ही सर्टिफिकिटे सहकारी सोसायटी, सहकारी व इतर बँका रिझर्व्ह बँक, सरकारी कंपनी किंवा खुद्द सरकार यांच्याकडे तारण ठेवण्याची सोय आहे.

वारस नेमण्याची तरतूदही आहे. सर्टिफिकिट खरेदी करणाऱ्याचा आपला मृत्यु झाल्यास त्या सर्टिफिकिटाची रक्कम कुणाला द्यावी याचे वारसपत्र एक किंवा अधिक व्यक्तींचे नावे करता येते.

अल्पबचत संचालनालय
महाराष्ट्र शासन
सचिवालय, मुंबई ३२

## वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] ७, मुगभाट रस्ता, मुंबई-४. [ टेलिफोन ३५६५०२

( १ ) बचत खाते :—व्याजाचा : दर द. सा. द. शे रु. ४=००


( २ ) महाराष्ट्र राज्यातील प्रमुख गावांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध


( ३ ) खास बचत योजना :—घरी बसून खात्यात पैसे भरता येतात.

*अधिक तपशिलासाठी लिहा अथवा भेटा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर









समुद्रांतल्या माशांचे प्रकार अनेक तसे पंपांचेहि प्रकार अनेक. किर्लोस्कर पंप म्हणजे अनेकविध पंपांचें आगरच! विविध शक्तीच्या आणि विविध उपयोगांच्या छोट्या मोठ्या किर्लोस्कर पंपांचा खेड्यापासून शहरापर्यंत आणि लहानशा बागायतीपासून विस्तीर्ण सहकारी शेतीपर्यंत सर्वत्र यशस्वीरीत्या वापर होत आहे.

दर्जा, विश्वसनीयता आणि कार्यक्षमता म्हणजेच किर्लोस्कर पंप.

किर्लोस्कर

* उद्यांच्या पंपाचा आज विचार
पंप निर्मितीत गेलीं ५० वर्षे अग्रेसर



STUSA KM 5/65

**किर्लोस्कर ब्रदर्स, लि.,** किर्लोस्करवाडी, जि. सांगली.


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.